**दिनांक २७.०१.२०१० रोजी मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्तरावर झालेले निर्णयाचे इतिवृत्त**

| **अ.नं** (०१) | **विषयाचे नाव** (०२) | **तपशील** (०३) | **झालेला निर्णय** |
|---|---|---|---|
| | | **बांधकाम विभाग** | |
| १. | **I)** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे माध्यमातून शिर्डी शहरातील नियोजित रस्ते विकसित करणेबाबत. (वाढीव खर्चास मान्यता मिळणेसाठीचा सुधारीत प्रस्ताव)<br><br>**II)** शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातील प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते पूर्णतः वगळून ते थेट संस्थानमार्फत विकसित करणेबाबत. | **I)** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांसाठी अंदाजित रक्कम रुपये ८८ कोटी मात्र इतका खर्च येईल, असे कळविलेले आहे. त्यानुसार वाढीव खर्च रुपये ६० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.<br><br>**०१. सुधारीत प्रस्ताव.**<br>०२. शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००६/८७६/ (१३१)/ का.सोळा, दिनांक १९ सप्टेंबर, २००८ अन्वये प्रथम प्राधान्य टप्प्यातील ११ रस्ते विकसित करणेसाठी भूसंपादन खर्चासह रक्कम रुपये २८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.<br>**०३. दिनांक ०५ जानेवारी, २०१० रोजी मा. अध्यक्षसो. यांचे स्वाक्षरीने पुनश्च पत्र देणेत आलेले आहे.**<br>**II)** शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी फक्त ०५ रस्ते तातडीने विकसित करणेसाठी उपलब्ध होत असल्याने, सदर रस्त्याचे विकासासाठी मरारविम यांनी जाहिर निविदा सुचना प्रसिध्द केलेली आहे. उर्वरित ०६ रस्ते सध्या अस्तित्वात व विनाविलंब उपलब्ध होणाऱ्या लांबी रुंदीसह थेट संस्थानमार्फत विकसित करणेस व सदर रस्ते मरारमविम यांचे कार्यप्रभाव क्षेत्रातून वगळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.<br>**मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावानुसार प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते थेट संस्थानमार्फत विकसित करणेस मान्यता मिळावी, म्हणून विनंती करणेत आलेली आहे.** | **सदर रस्त्यासाठी एकूण रुपये ८८ कोटी इतक्या खर्चापैकी रुपये २८ कोटी खर्चास मान्यता मिळालेली असून उर्वरित रुपये ६० कोटी इतक्या खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच एकूण ११ रस्त्यापैकी पाच रस्ते महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाने करावेत व उर्वरित सहा रस्ते शिर्डी संस्थानने करावेत असे बैठकीत ठरले . तसेच डी.एस.आर प्रमाणे जो भाव असेल त्याप्रमाणे अंदाजपत्रके तयार करावीत असे सांगितले. उपाध्यक्ष श्री कोल्हे यांनी बैठकीत सांगितले. मात्र सदर प्रस्ताव हा दोन वर्षापासूनचा असून नगरपालिकेने याबाबत ठराव करुन दिलेला आहे, असे प्रधान सचिव व विधी परामर्शी यांनी सागितले.**<br><br>**चालू डी.एस.आर प्रमाणे अंदाजपत्रके तयार करावीत, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला जर काही आक्षेप नसेल तर आर्बिटैटरची आवश्यकता नाही. तरी प्रथम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळासमवेत एक बैठक आयोजित करावी असे सचिव, विधी व न्याय विभाग यांनी बैठकीत सांगितले. तसेच आता संपूर्ण रुपये ८८ कोटीच्या प्रस्तावास मान्यता दिल्यास पून्हा सदर प्रस्तावास शासनाची आवश्यकता रहाणार नाही. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर मा.मंत्री (विधी व न्याय व मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येईल असे प्रधान सचिव व विधी परामर्शी यांनी सांगितले.** |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी हद्दीतील नवीन पिंपळवाडी रस्त्याचे कॉंक्रिटीकरण संस्थानच्या माध्यमातून करणेबाबत. (वाढीव खर्चास मान्यता मिळाणेबाबतचा सुधारीत प्रस्ताव) | मा. विधी व न्याय विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक १६९(३३) दि. १७ जुलै, २००९ अन्वये रक्कम रुपये ३.६३ कोटी मात्र खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार विहीत पध्दतीने निविदा मागवून बांधकाम ठेकेदारास कार्यादेश देणेत आलेला आहे. तथापि या कामी सल्लागार शुल्कासह अंदाजित रक्कम रु. ४.०१ कोटी मात्र इतका खर्च येणार असल्याने, मंजूर रक्कमेपेक्षा होणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.<br>**वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, शासनस्तरावर प्रलंबित.** | **सदर प्रस्तावाच्या रुपये ३.६३ कोटीच्या खर्चास मान्यता मिळालेली असून याकामी येणाऱ्या सल्लागार शुल्कासह अंदाजित रक्कम रुपये ४.०१ कोटीच्या खर्चास मान्यता द्यावयाची आहे. याबाबत ॲक्टप्रमाणे जरी अधिकार नसेल तरी वार्षिक आराखडा तयार करुन त्यास मंजूरी घ्यावी. त्याप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे, असे मा.मंत्री, विधी व न्याय यांनी बैठकीत सांगितले.** |
| ३. | शिर्डी परिसरातील पिंपळवाडी व कोहकी येथील साठवण बंधारे बांधण्याकरीता संस्थानमार्फत अर्थसहाय्य करणेबाबत. (वाढीव खर्चासह मान्यता मिळणेसाठी सुधारीत प्रस्ताव) | **०१.** मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्रमांक ७२६(१२) दिनांक ३० जून, २००८ नुसार रक्कम रुपये २३,८०,३३१/- मात्र इतके रक्कम मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार विहीत पध्दतीने निविदा मागवून बांधकाम ठेकेदारांना कार्यादेश देणेत आलेले आहेत.<br>**०२.** सदरहू साठवण बंधारेसाठी मंजूर रक्कमेव्यतिरिक्त रु. १०,११,८२७/- मात्र जादा खर्च येणार असल्याने, या जादा खर्चास मंजुरी मिळणेसाठी सुधारीत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.<br>**०१. जादा खर्चास मान्यता मिळणेसाठी सुधारीत प्रस्ताव.**<br>**०२. शासनस्तरावर प्रलंबित.** | **यापूर्वी मंजूरी दिलेल्या निधीमधून केलेल्या खर्चाची माहिती संस्थानकडून मागविण्यात आलेली असून सदर माहिती प्राप्त झाल्यावर प्रस्तावावर कार्यवाही करण्यात यावी.** |
| ४. | संस्थानचे आर्थिक सहाय्यातून शिर्डी पोलिस कार्यालयासाठी एका खोलीचे बांधकाम व संपूर्ण कार्यालयास रंगकाम करुन देणेबाबत. | विषयांकित काम संस्थान निधीतून करणेस व याकामी रक्कम रुपये २,७८,४०१/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.<br>**मा. विधी व न्याय विभागाने त्यांचेकडील दिनांक २४ नोव्हेंबर, २००९ रोजीचे पत्राने सदर प्रस्तावास छाननी समितीची मान्यता घेऊन व प्रस्तावाची विधीग्राहयता तपासून सादर करणेबाबत कळविले आहे. छाननी समितीचे विचारार्थ प्रस्ताव सादर करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे.** | **सदर प्रस्तावास छाननी समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर शासनाची मान्यता देणेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. तसेच विधी व न्याय विभागातील संबंधित अधिकाऱ्याने महिन्यातून १-२ वेळा शिर्डी येथे जाऊन तेथील प्रश्न सोडवावेत असे निर्देश मा.मंत्री, विधी व न्याय यांनी दिले.** |
| ५. | पायाभूत सुविधा विकास योजने अंतर्गत शिर्डी व राहाता शहरासाठी | शिर्डी व राहाता शहरासाठी घनकचरा व्यवस्थापन योजना राबविणेकामी सर्वकष प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ञ सल्लागार संस्था | **सदर प्रकल्प संस्थानतर्फे राबवयाचा असेल तर नगरपरिषदेचे जे स्वच्छता कर्मचारी आहेत त्यांचे काम काय, अशी विचारणा** |

| | | | |
|---|---|---|---|
| | घनकचरा व्यवस्थापन योजना राबविणेसाठी संस्थानतर्फे सल्लागार नेमणेबाबत.<br>**सुधारीत प्रस्तावाचा विषय :**<br>**घनकचरा प्रकल्प उभारणेबाबत.** | नेमणेबाबत व त्यासाठी सल्लागार शुल्क आदा करणेबाबत मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.<br>तथापि, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ मार्च, २००९ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, घनकचरा प्रकल्प खाजगी संस्थेमार्फत, शिर्डी नगरपंचायत व राहाता नगरपरिषद यांच्या सहकार्याने घनकचरा प्रकल्प उभारणेबाबतचा सुधारीत निर्णय घेणेत आलेला आहे.<br>**०१. मा. विधी व न्याय विभागाने त्यांचे कडील दिनांक २२ एप्रिल, २००८ रोजीचे पत्रानुसार सदरहू प्रकल्पाबाबत प्राथमिक स्वरुपाची रुपरेखा, त्याची आवश्यकता व त्याकरीता लागणाऱ्या खर्चाचा अंदाज, योजना कायमस्वरुपी राबविणेसाठी दरवर्षी येणारा खर्च, सल्लागार संस्थेस देऊ केलेली फी याबाबत ची माहिती मागविणेत आलेली होती.**<br>**०२. इकढील दिनांक २० सप्टेंबर, २००८ रोजीचे पत्रानुसार मा. विधी व न्याय विभागास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व राहाता नगरपरिषद, राहाता यांचेकडून प्राप्त झालेली माहिती कळविणेत आलेली आहे.**<br>**सुधारीत प्रस्ताव**<br>**०३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ मार्च, २००९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, खाजगी संस्थेमार्फत घनकचरा प्रकल्प उभारणेत येणार आहे. सदरहू प्रकल्पासाठी संस्थान हिश्श्याचा येणारा खर्च रक्कम रु. ३१.७५ मात्र पर्यन्तचा निधी उपलब्ध करुन देणेच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव दि. २४ मार्च, २००९ रोजी पाठविणेत आलेला आहे.** | **उपाध्यक्ष श्री कोल्हे यांनी केली .**<br>**घनकचरा प्रकल्प उभारण्यासाठी नगरपरिषदेकडून सवलत देण्यात आलेली आहे असे कार्यकारी अधिकारी श्री मोरे यांनी बैठकीत सांगितले असता सदर प्रकल्पास मान्यता देण्यात येत आहे. असे मा.मंत्री विधी व न्याय यांनी सांगितले.** |
| ६. | अहमदनगर - मनमाड रस्ता दुभाजक सुशोभिकरण करणेकामी खर्चास मान्यता मिळणेबाबत. | अहमदनगर - मनमाड रस्ता दुभाजक सुशोभिकरणासाठी आलेल्या रक्क्कम रु. ३,०३,३३६/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.<br>**नवीन प्रस्ताव.** | **प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी असे ठरले.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | साई निकेतन (दादर, मुंबई) इमारतीचे विस्तारीकरणासह नव्याने बांधकाम करणेबाबत. | दादर, मुंबई येथील संस्थान मालकीच्या साईनिकेतन या इमारतीचे विस्तारीकरणासह नव्याने बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव.<br>**मा. विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक १७ जुलै, २००९ रोजीचे पत्रातील बाबींबाबत कायदेशीर अभिप्राय घेणेत येत असून, तद्‌नंतर साईनिकेतन इमारत नुतनीकरण करणेबाबतचा सविस्तर अहवाल पाठविणेत येत आहे.** | **मुंबईमध्ये जी साईनिकेतन इमारत आहे त्या इमारतीमध्ये धर्मादाय कार्ये करण्यास प्रस्तावित असल्याचे कार्यकारी अधिकारी श्री मोरे यांनी सांगितले असता अध्यक्ष श्री ससाणे यांनी असे सांगितले की, सदर इमारतीमध्ये सध्या ७-८ भाडेकरु आहेत त्यांना इतरत्र चांगल्या ठिकाणी जागा देऊन त्यांना २-३ वर्षाचे भाडे जादा द्यावे लागेल व त्यासाठी २.०० ते २.५ कोटी इतका खर्च येईल. या संदर्भात प्रधान सचिव विधी परामर्शी यांनी अशा सुचना केल्या की, सध्याचे भाडेकरु आहेत त्यांना चांगल्या ठिकाणी जागा देऊन सदर इमारतीमध्ये रिसर्च सेंटर, रिडींग रुम, लायब्ररी इ. गोष्टी असाव्यात जेणेकरुन गरीब व गरजू मुलांना त्याचा फायदा होईल व नियमित उत्पन्न संस्थानला मिळू शकेल.तसेच या बाबत BOT तत्वावर योजना राबविणेबाबत विचार करावा व तत्वत: मान्यता देण्यात येत असून सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले.** |
| | | **लेखाशाखा विभाग** | |
| ८. | श्री साईबाबा संस्थान अधिनियम कलम २२ (२) मधील तरतूदींन्वये स्थापित व्यवस्थापन निधीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत | जा. नं. ९७१८/०९ दि.१.०८.०९ अन्वये सन २००४-०५ ते २००७-०८ पर्यंतचे जादा खर्चास मान्यतेसाठी **प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे, त्यावर अद्याप आदेश होणे आहेत.** | **सदर प्रस्तावास मंजूरी देण्यास प्रधान सचिव विधी व परामर्शी यांनी मान्यता दिली. तथापि या संदर्भातील एकत्रित प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात येत आहे.** |
| | | **वशी- ०१ (आस्थापना विभाग)** | |
| ९. | विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील तरतूदीन्वये स्थापित निधीमध्ये प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचे मर्यादेपर्यंत वाढ करण्याबाबत तसेच व्यवस्थापन निधीबाबतच्या अधिनियमातील तरतुदीत सुधारणा करण्याबाबत. | क्रमांक सासंवि-२००५/७८७/(११४)/सोळा विधी व न्यायविभाग, मंत्रालय मुंबई ३२ दि.०३ ऑक्टोबर-२००८ कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग यांचेकडून १) सस्थानच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या वेतन व भत्यावरील खर्चाची छाननी करण्यात येऊन तो कमीतकमी कसा होईल याबाबत अहवाल सादर करावा.<br>२) कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या इत्यादी आस्थापनावरील कर्मचा-यांच्या वेतनावरील खर्च तसेच दौ-यावरील खर्चाची (प्रवासखर्चाची) | **सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात प्रधान सचिव विधी परामर्शी यांनी मान्यता दिली. तथापि या संदर्भातील एकत्रित प्रस्तावास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात येत आहे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पडताळणी करुन तो कमीतकमी करण्याबाबत कार्यवाही करुन, तपशीलवार माहिती शासनास सादर करण्यात यावी. असे कळविले आहे.<br>इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०१/३७६९/२००९ दि.०१ एप्रिल २००९ नुसार श्री साईबाबांच्या दर्शनासाठी भक्तांना सुलभ दर्शनाबरोबरच सुरक्षा, निवास,भोजन,कॅन्टीन इ. सेवा पुरविणे हे मुख्य व महत्वाचे काम आहे. सुरक्षा व्यवस्थेसाठी आवश्यक ते पहारेकरी, निवास व भोजनगृहातील मदतनीस, स्वच्छता कर्मचारी इ. ठिकाणी बहुतांशी कर्मचारी कंत्राटदारामार्फत घेऊन Out Sourcing करण्यात येते व होणा-या खर्चावर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. असे कळविले आहे.<br>**शासन मान्यता येणे बाकी आहे.** | |
| १०. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम -२००४ मधील तरतूदींमध्ये आवश्यक बदल करणेबाबत | अ) प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/वशी-०१/२१२/ २००९ दि.१५ जानेवारी २००९ अन्वये अधिनियम दुरुस्ती, नियम दुरुस्ती व विनियमाचे मसुदे शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहेत.<br>शासन पत्र क्रमांक सासंवि-२००९/२६७ /(२१)का.सोळा न्याय व विधी विभाग मंत्रालय मुंबई दि.११ जून २००९ रोजीचे पत्राने" संस्थानने सुचविलेल्या बदलास व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी. सुचविलेल्या बदलास सुस्पष्ट कारणमिमांसा देण्यात यावी. आणि सुचविलेल्या सुधारणाबाबतचे मराठी प्रारुप सादर करावे". अशी विचारणा करण्यात आली आहे.<br>त्यावर इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०१/७३८१/२००९ दि.१४/०६/२००९ नुसार फेर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.<br>**शासन मान्यता येणे बाकी आहे.** | **सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात प्रधान सचिव विधी परामर्शी यांनी मान्यता दिली. तथापि या संदर्भातील एकत्रित प्रस्तावास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात येत आहे.** |
| | | **विद्युत विभाग** | |
| ११. | नगर-मनमाड रोडवर हाय-मास्ट पोल उभे करून त्यावर मेटल | **०१)** जा.नं.एसएसएस / विद्युत / ९३५८ / २००६ दि. १५-०७-२००६ अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवून काम करुन घेणेस व | **प्रस्तावास अगोदरच मान्यता देण्यात आली आहे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | हॅलाईड लॅम्प बसविणे बाबत. | येणा-या खर्चास मान्यता मिळाली.<br>**०२)** सासंवि-२००६ / ६६४ / (१००) / का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि. १७ जानेवारी, २००८ प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदर प्रस्तावाची अद्याप आवश्यकता आहे काय ? याबाबतची माहिती पाठविणेबाबत.<br>**०३)** जा.नं.एसएसएस / विद्युत / ३०३४ / २००८ दि. २७-०२-२००८ माहिती सादर केली.<br>**०४)** सासंवि-२००६ / ६६४ / (१००) / का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २४ एप्रिल, २००८ शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या छाननी समितीची मान्यता घेऊन प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत.<br>**०५)** जा.नं.एसएसएस / विद्युत / ७२७२ / २००८ दि. १७-०५-२००८ छाननी समितीची मान्यता घेणे गरजेची नसल्याबद्दल व कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत पत्र सादर केले.<br>**०६)** सासंवि-२००६ / ६६४ / (१००) / का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि. १७ डिसेंबर, २००८ शासनाची मंजूरी का घेण्यात आली नाही. याबाबत खुलासा बाबत.<br>**०७)** जा.नं.एसएसएस / विद्युत / २४९३ / २००९ दि. ०२-०३-२००९ खुलासा पाठविला.<br>**काम पूर्ण झाले. परंतू शासनाची मान्यता येणे बाकी.** | |
| १२. | शिर्डी शहरातून नगर-मनमाड या राजमार्गावर ठिकठिकाणी ट्रॅफिक सिग्नल बसविणेबाबत. | **०१)** जा.नं.एसएसएस / विद्युत / ३७७६ / २००९ दि. ०२-०४-२००९ अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहिर निविदा बोलावून येणा-या रक्कम रु. २७,००,०००.०० मात्र अपेक्षित खर्चास मान्यता मिळणे.<br>**०२)** सासंवि-२००९ / २६१ / (१७) / का.सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २ जून,२००९ ही मालमत्ता शासनाकडे हस्तांतरीत होत असल्याने करावयाचे पुर्ततेबाबत माहिती सादर करणे.<br>**०३)** जा.नं.एसएसएस / विद्युत / ७४४ / २००९ दि. ११-०७-२००९ शासन पत्रातील बाबींची पुर्तता केलेबाबत संबंधित कागदपत्रांसह | **कार्योत्तर मंजूरी देण्यास मान्यता देण्यात आली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अहवाल दिला. **मे.केरला स्टेट इलेक्ट्रॉनिक्स डेव्हलपमेंट कार्पो.लि., (केल्ट्रॉन), मुंबई यांना कार्यादेश देण्यात आलेला असून काम चालू आहे. परंतू शासनाची मान्यता येणे बाकी.** | |
| **वशी- ०२ (विधी विभाग)** | | | |
| १३. | शिरडी नगरपंचाययत शिरडी यांना स्वच्छता व आरोग्य पथकर (नाकेबाबत ) अनुदान प्रतिवर्षी रुपये- ४०,००,०००/- (अक्षरी रुपये- चाळीस लाख ) मात्र. | **०१)** जा.नं.एसएसएस/वशी-०२/ १३०५४/ ०५ दि.०९/११/२००५ अन्वये शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांकडून शिरडी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर आकारु नये, याकरीता शिरडी नगरपंचायत यांनी मागणी केलेली रक्कम प्रतीवर्षी रुपये- ३९,६१,९९०/- पुर्णांकिंत रक्कम रुपये- ४०,००,०००/- प्रती तीन महिन्यास रुपये- १०,००,०००/- याप्रमाणे आगाऊ रक्कम शिरडी नगरपंचायतीस देण्यात यावी,असे मा.जिल्हाधिकारी, अहमदनर यांनी सांगितले. सर्वानुमते त्यास मान्यता देण्यांत आली. सदरहू विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, त्यानतंर याकामी शासनाची मान्यता घेण्यांत यावी. शासनाचे मान्यतेनतंर पुढील कार्यवाही करणेत येईल असे ठरले. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी, अधिनियम -२००४ चे कलम २१ (२) (सी) चा विचार करता शिरडी नगरपंचायत शिरडीस अनुदान देणेबाबत शासनाची परवानगी घेणे जरुरीचे आहे.<br>**०२)** क्रं.सासवि-२००५/६६२/ (१३३) का. सोळा विधी व न्याय विभाग, मंत्रालय दिनांक ११ ऑगष्ट-२००९ चे पत्र- सदर प्रकरणी शिरडी नगरपंचायत शिरडी यांना विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रक ( पथकर ) याबाबत संस्थान व शिरडी नगरपंचयात यांचेमध्ये लेखी करार करण्यात येऊन, शासनास अवगत करावे, जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.<br>**०३)** जा.नं.न.नं.प.साप्र/कावि-०१/ १५३/ १० दि.०१/०१/२०१० अन्वये सदर पत्रास अनुसरुन संस्थानने शिरडी नगरपंचायत शिरडी यांचेकडे पाठविलेला करारनामा मसुदात कांही सुधारणा करुन दि.०१/०१/२०१० | **प्रतीवर्षी रुपये ५० लाख देण्याबाबतचा निर्णय झाला.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रोजी संस्थानकडे पाठविला असून त्याबाबतचा विचार करुन करारनामा करणेत येत आहे. तसे शासनास करारनाम्याचे प्रती त्वरीत शासनास पाठविण्यात येत आहे.<br>**शिरडी नगरपंचायतकडून प्राप्त झालेला करारनामा Execute करुन शासनास अवगत करणेत येत आहे.** | |
| **श्री साईबाबा हॉस्पिटल (स्टोअर विभाग)** | | | |
| १४. | चिकनगुनीया या साथ रोगावर खरेदी केलेल्या औषधे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत | ०१)जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ स्टोअर/ (पी/एस)/ ९८७६/ २००९ दि.०७.०८.२००९<br>०२)जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ स्टोअर/ (पी/एस)/ १२१२५/ २००९ दि.२९.०९.२००९<br>०३)जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ स्टोअर/ (पी/एस)/ १२१७४/ २००९ दि.१४.१२.२००९<br>**सासंवि२००९/६३१/(६१) का.सोळा दि.०६.०१.२०१० अन्वये सदर प्रस्तावास तीन वर्ष विलंब का झाला व याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अहमदनगर यांचे अभिप्राय मागवुन सादर करणे माहिती मागविण्यात आलेली आहे. त्यानुसार अलहिदा माहिती सादर करण्यात येत आहे.** | **प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी असे ठरले.** |
| १५. | श्री साईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दुकान चालविणेस देणेबाबत. | (०१)जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ स्टोअर/(पी/एस)/ १२८६६/ २००८ दि.०१.०९.२००८<br>(०२)जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ स्टोअर/(पी/एस)/ ९०९७/ २००९ दि.२२.०७.२००९<br>(०३)जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ स्टोअर/(पी/एस)/ ११६०/ २०१० दि.१८.०१.२०१०<br>**सासंवि२००९/१९६/(१०) का.सोळा दि.०८.०७.२००९ चे पत्रान्वये मागविण्यात आलेली माहिती पत्र क्र. ११६०/२०१० दि.१८.०१.२०१० अन्वये सादर करण्यात आलेली आहे.** | **श्री साईबाबा रुग्णालयाच्या इमारतीचे खाली औषधाचे दूकान काढून एम.आर.पी पेक्षा ५% कमी दराने औषधे विकावीत तसेच शेड्यूलप्रमाणे औषधांची वर्गवारी करुन ग्राहकास सवलत देण्यात यावी, असे बैठकीत ठरले.** |

| | | वाहन विभाग | |
|---|---|---|---|
| १६ | भूसंपादन अधिकारी यांना संस्थानमार्फत वाहन खरेदी करून देण्यात आलेले आहेत, त्यास कार्यात्तर मान्यता मिळणे बाबत. | **०१)** शासन पत्र क्रं. साबांस /१००५/ २४(७४)/ का.१७, विधी व न्याय विभाग दि.१६.०३.२००५ अन्वये संस्थानने भुसंपादन अधिकारी यांना खरेदी करून देण्यात आलेल्या गाडया कोणाच्या नांवे, परत संस्थानला करणार किंवा कसे? वगैरे माहिती मागविणेत आलेली होती.<br>इकडील पत्र क्रं. एसएसएस/ वाहन/५२३९/ दिनांक १८.०५.२००५ अन्वये माहिती पाठविणेत आलेली होती.<br>**०२)** शासन पत्र क्रं.सांसवि/२००५/ क्रं. सांसवि/२००५ /३६४/ १११ /सोळा दि.१८.०४.२००६ अन्वये जाळण्यात आलेल्या शासकीय वाहनांची विमा बाबत माहिती तसेच तक्रारीची (FIR) प्रत बाबत माहिती मागविण्यात आली होती.<br>सदर माहिती इकडील पत्र क्रं.एसएसएस/ वाहन/ ५५१४/ दिनांक २६.०४.०६ अन्वये माहिती शासनास सादर केलेली होती.<br>**०३)** शासन पत्र क्रं. सासंवि/२००५/ ३६४/ (१११)-का. सोळा, दि.०७ जून २००६ अन्वये खालील प्रमाणे मागणी करणेत आलेली होती.<br>१) जास्त किंमतीचे वाहन का उपलब्ध करून देण्यात आले?<br>२) वाहने देण्याबाबतचा प्रस्ताव कोणी सादर केला?<br>३) शासनाची पुर्व परवानगी घेतली होती काय?<br>उप विभागीय अधिकारी, श्रीरामपूर व तहसीलदार राहाता यांना वरील प्रमाणे माहिती संस्थानकडे पाठविणे बाबत इकडील पत्र क्रं.एसएसएस/ वाहन/८३९८/२००६ दिनांक २७/०६/२००६ अन्वये माहिती मागविण्यात आली होती.<br>वरील प्रमाणे माहिती मिळालें नंतर इकडील एसएसएस/ वाहन/१२४४१/ ०७ दि.१०/०८/२००७ ने मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पत्र दिलेले आहे.<br>**०४)** शासन पत्र क्रं. सासंवि/ २००५/ ३६४/ (१११)-का. सोळा, दि.२२ एप्रिल २००८ अन्वये खालील प्रमाणे माहितीची मागणी करणेत आलेली होती.<br>अ) जाळपोळीमुळे नष्ट झालेल्या गाडयांचा विमा उतरविला नाही ही बाब जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडून प्रमाणित करून घेण्यात यावी.<br>ब) जाळपोळीमुळे नष्ट झालेल्या गाडयांच्या बदल्यातनवीन गाडी खरेदी करण्यासंदर्भात शासनाची परवानगी घेतली होती काय?<br>क) ज्या अधिकाऱ्यांना वाहन उपलब्ध करून दिले आहे ते अधिकारी शासकीय नियमानुसार सदर वाहने (वाहनांची किंमत विचारात घेता) धारण | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्यास पात्र नाहीत त्यामुळे संस्थानची कृती नियमबाहय आहे असे वाटते, त्यानुसार आपले अभिप्राय<br>ड) खरेदी केलेल्या गाडयांची नोंदणी अधिकाऱ्यांच्या पदनामाने न करता नावाने का करण्यात आली.<br>इ) वाहने कायमस्वरूपी संबंधीत अधिकाऱ्यांना दिली आहेत. सदर वाहने वापरानंतर संस्थानास परत मिळणार नाही. संबंधीत अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी मालकी तत्वावर वाहन उपलब्ध करून देण्यामागे कोणते प्रयोजन आहे. सदर प्रयोजन अधिनियमाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे काय? नसल्यास या प्रकरणी न्यायलयात आव्हान दिले गेल्यास व न्यायलयाने त्यासंदर्भात प्रतिकूल निर्णय दिल्यास त्याची जबाबदारी कोणावर राहील?<br>इकडील पत्र क्रं. एसएसएस/ वाहन/ ७२८३/ दिनांक १७.०५.२००८ अन्वये माहिती पाठविणेत आलेली होती.<br>**०५)** शासन पत्र क्रं. सासंवि/ २००५/ ३६४/ (१११)- का.सोळा, दि.२० जुन २००८ अन्वये खालील प्रमाणे माहितीची मागणी करणेत आलेली होती.<br>जाळपोळीत नष्ट झालेल्या गाडयांचा विमा उतरविलेला नाही ही, बाब जिल्हाधिकारी यांचेकडून प्रमाणित करून त्यानुसार माहिती शासनास सादर करणे बाबत.<br>इकडील पत्र क्रं. एसएसएस/ वाहन/ ९८०३/ दिनांक ०५.०७.२००८ ने जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच एसएसएस/ वाहन/१०४२/ दिनांक २२.०१.२००९ ने भू-संपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर. तसेच मा.तहसिलदार, राहाता यांना माहिती कळविणे बाबत पत्र दिले.<br>उपविभागीय अधिकारी यांचेकडून माहिती न मिळाल्याने त्यांना इकडील पत्र क्रं. एसएसएस/वाहन/१८९८/ दिनांक १६.०२.२००९ ने जाळपोळीत नष्ट झालेल्या गाडयांचा विमा उतरविलेला असलेबाबत कागदपत्रे किंवा विमा उतरविलेला नसल्यास त्याबाबतचे पत्र तात्काळ देणे बाबत कळविले.<br>**उपविभागीय अधिकारी यांचेकडून माहिती न मिळाल्याने पत्र क्रं. एसएसएस/ वाहन/ ५१०८/ दिनांक ०१.०५.२००९ ने स्मरणपत्र दिले.** | |
| **श्री साईबाबा हॉस्पिटल (स्टोअर विभाग)** | | | |
| १७ | श्री साईनाथ रुग्णालयामधील जुने सी.आर्म मशिनची नोंद डेडस्टॉक मधून निर्लेखिक करणेबाबत. | जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ स्टोअर/ (पी/एस)/ १२५३६/ २००९ दि.०८.१०.२००९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.<br>**सासंवि२००९/ ८०२/ (८५) का.सोळा दि.२२/१२/२००९ अन्वये अधिनियम २००४ च्या कोणत्या कलमाअन्वये खरेदी करण्यात आले अशी** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **माहिती मागविण्यात आलेली आहे. त्यानुसार अलहिदा माहिती सादर करण्यात येत आहे.** | |
| १८ | श्री साईनाथ रुग्णालयामधील जुने एक्स-रे फिल्म ऑटो प्रोसेसर मशिनची नोंद डेडस्टॉकमधून निर्लीखीत करणेस मान्यता मिळणेबाबत. | (०१)जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ स्टोअर/ (पी/एस)/ १५७११/ २००९ दि.२६.१२.२००९ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.<br>**अद्याप याबाबत शासनाचे काही निर्देश आलेले नाही.** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |
| | | **वशी- ०३ (अनुदान)** | |
| १९ | महाराष्ट्रातील अपंगांना तीन चाकी सायकलचे वाटप करणे. | **१)** शासन पत्र क्र.२००६/ २७४/ (३६)-का सोळा, विधी व न्याय विभाग दि.२९/६/२००६ अन्वये, नियमावली तयार करुन शासनाची मान्यता घ्यावी तसेच एका विशिष्ट कालावधीनंतर अपंगांना १०० सायकलींचे वाटप करावे असे कळविले.<br>**२)** इकडील दि.२५/११/२००६ चे पत्रान्वये नियमावली शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात आली आहे. शासनाचे दि.३१/५/०७ चे पत्रान्वये फक्त विद्यार्थ्यांनाच सायकली देण्यास मान्यता दिली.<br>**३)** इकडील दि.२/७/२००७ चे पत्रान्वये महाराष्ट्रातील सर्व थरातील अपंगांना सायकल देणेस मान्यता मागितली आहे.<br>**४)** शासनाने दि.५/६/२००८ चे पत्रान्वये संस्थानने किती सायकलींचे वाटप केले. इतर थरातील अपंगांकडुन मागणी आलेली आहे काय असे कळविले होते. त्यास अनुसरुन इकडील दि.२७/१०/२००८ चे पत्रान्वये २५ सायकलचे वाटप केलेले असून १२४ अपंगांनी अर्ज केलेले आहे, असे शासनास कळविले आहे.<br>**इकडील दि.२७/१०/२००८चे पत्रानंतर शासनाचे निर्देश येणे आहेत.** | **सदर प्रकल्पासाठी ॲन्यूअल रेग्यूलर प्रोग्राम करुन जास्त निधीची तरतूद करावी तसेच अपंगत्वाबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे, अशी सूचना प्रधान सचिव विधी परामर्शी यांनी बैठकीत दिल्या**<br>**सदर प्रकल्प हा जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा ज्याप्रमाणे प्रकल्प राबविते तसा राबविण्यात यावा. तसेच प्रकल्प राबवितांना काळजी घ्यावी असे मा.मंत्री विधी व न्याय यांनी सुचित केले. तसेच अपंगत्वाचे प्रमाण जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून घेण्यात यावे असे उपाध्यक्ष श्री कोल्हे यांनी सुचविले. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे असे मा.मंत्री विधी व न्याय यांनी बैठकीत सांगितले.** |
| २० | श्री साईबाबा संस्थानतर्फे अर्थ सहाय्य मिळण्यासाठी ठरविणेत आलेल्या पात्रतेच्या निकषास मान्यता मिळणेबाबत. | दि.०३/०९/२००९ चे पत्रास अनुसरुन शासनाचे काहीही निर्देश आलेले नाही.<br>**इकडील दि.०३/०९/२००९ चे पत्रास अनुसरुन शासनाचे निर्देश येणे आहेत.** | **छाननी करुन निकष ठरवावेत तसेच रुल्स तयार करुन पूढील कार्यवाही लवकरात लवकर करणेबाबत मा.मंत्री विधी व न्याय यांनी निर्देश दिले.**<br>**यावर याबाबतचे सर्व रुल्स तयार असल्याबाबत श्री मोरे कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीत सांगितले.** |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | नांदुर्खी बु.ता.राहाता, जि.अ.नगर या गांवाची विकास कामे करणे | **१)** जा.नं.वशी-३/८८९६/ २००९, दि.१८/०७/२००९ पत्रास अनुसरुन शासनाने दि.१७/०८/२००९ व दि.०१/०९/२००९ चे पत्रान्वये, कामाचे अंदाजपत्रक, आराखडे व सदर काम कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती मागवली आहे.<br>**२)** शासनाचे पत्रास अनुसरुन सरपंच नांदुर्खी यांना इकडील दि.२८/०८/२००९ चे पत्र देऊन माहिती शासनाने मागविलेली माहिती मागितली आहे. त्यांनी अद्याप इकडे माहिती दिलेली नसल्यामुळे शासनाला माहिती दिलेली नाही.<br><br>**ग्रामसेवक व सरपंच नांदुर्खी याना पुन्हा स्मरणपत्र देऊन त्याची प्रत शासनास पाठविणेसाठी पत्र मा.का.अ. सो. यांचे स्वाक्षरीसाठी पाठविले आहे.** | **आराखडा तयार करुन प्रस्ताव सादर करणेबाबतच्या सूचना मा.मंत्री विधी न्याय यांनी दिल्या.** |
| २२ | जि.प.अ नगर यांचे लघुपशुवैद्यकीय चिकित्सलये व पशुवैद्यकीय दवाखाने यांना आर्थिक मदत | **१)** शासनाने दि. ११/१२/२००७ चे पत्रान्वये प्रस्ताव छाननी समितीचे मान्यतेसाठी पाठविला होता.<br>**२)** सदरचा प्रस्ताव दि.२८/०६/२००९ चे छाननी समितीचे सभेपूढे ठेवला होता.<br>**३)** सदर प्रस्ताव शासनाचा असल्याने छाननी समितीचे अखत्यारीत नसल्याने इकडील दि.११/०७/२००९चे पत्रान्वये शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यात आला.<br>**इकडील दि.११/०७/२००९ चे पत्रास अनुसरुन शासनाचे निर्देश येणे आहेत.** | **प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी द्यावी असे तसेच अशा प्रकारचा खर्च पून्हा शासनास विचारल्याशिवाय करण्यात येऊ नये असे ठरले.** |
| २३ | शिर्डी पोलीस स्टेशन यांना वस्तु स्वरुपात मदत | **१)**जा.नं.वशी-३/६३९४/०५, दि.२०/६/ २००५ प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठवला.<br>**२)** शासनाचे दि.०९/०५/२००६ चे पत्रान्वये प्रस्ताव छाननी समितीचे निर्देशासाठी परत पाठवला.<br>**३)** सदरचा प्रस्ताव दि.२८/०६/२००९ चे छाननी समितीचे सभेपूढे ठेवला होता.<br>**४)** सदर प्रस्ताव शासनाचा असल्याने छाननी समितीचे अखत्यारीत येत नसल्याने इकडील दि.२७/०७/२००९ चे पत्रान्वये शासनाकडे निर्णयासाठी | **प्रस्ताव विभागाने अमान्य केलेला आहे. तथापि मा.मंत्री (विधी व न्याय ) यांनी प्रस्तावास मंजूरी देण्याची निर्देश दिले.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पाठविण्यात आला.<br>**इकडील दि.२७/०७/२००९ चे पत्रास अनुसरुन शासनाचे निर्देश येणे आहेत.** | |
| २४ | जिल्हा परिषद अहमदनगर | **१)** मा.व्य.समितीचे दि.२८/७/०७ चे सभेतील निर्णय क्र.५९४ मॉडेल स्कलचे बांधकामास रु.३५.८१ लाख मदत मंजुर केली.<br>**२)** सदरचा प्रस्ताव दि.२४/०९/२००७ चे पत्रान्वये शासनाचे मान्यतेसाठी पाठविला होता.<br>**३)** शासनाचे दि.११/१२/२००७ चे पत्रान्वये प्रस्ताव छाननी समितीचे मान्यतेसाठी परत पाठविणेत आला होता.<br>**४)** सदरचा प्रस्ताव दि.२८/०६/२००९ चे छाननी समितीचे सभेपूढे ठेवला होता.<br>**४)** सदर प्रस्ताव कलम २१ (२) नुसार छाननी समितीचे अखत्यारीत नसल्याने इकडील दि.११/०७/२००९ चे पत्रान्वये शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यात आला.<br>**इकडील दि.११/०७/२००९ चे पत्रास अनुसरुन शासनाचे निर्देश येणे आहेत.** | **याबाबतचे शासन निर्णय काढलेले आहेत असे बैठकीत सांगण्यात आले. तथापि जिल्हापरिषदेच्या शाळांना बेंचेस पूरविण्याचे आदेश काढण्यात आले असून मॉडेल स्कूलचा प्रस्ताव प्रलंबित आहे.** |
| २५ | कु.श्रिया नितीन विद्वांस,मुंबई | **१)** मा.व्य.समितीचे दि.२८/७/०७ चे सभेतील निर्णय क्र.५८७ स्पर्धेसाठी रु.३ लाख देण्यास मान्यता दिलेली आहे.<br>**२)** सदरचा प्रस्ताव दि.२०/०६/२००५ चे पत्रान्वये शासनाचे मान्यतेसाठी पाठविला होता.<br>**३)** शासनाचे दि.०९/०५/२००६ चे पत्रान्वये प्रस्ताव पुनविचारार्थ पाठविणेत आला होता.<br>**४)** सदरचा प्रस्ताव दि.२८/०६/२००९ चे छाननी समितीचे सभेपूढे ठेवला होता.<br>**४)** सदर प्रस्ताव वैयक्तीक असल्याने छाननी समितीचे अखत्यारीत नसल्याने इकडील दि.१८/०७/२००९ चे पत्रान्वये शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यात आला.<br>**इकडील दि.१८/०७/२००९ चे पत्रास अनुसरुन शासनाचे निर्देश येणे आहेत.** | |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | चि.पृथ्विराज प्रदिप औताडे, पुणे | **१)** सदरचा प्रस्ताव दि.२०/०६/२००५ चे पत्रान्वये शासनाचे मान्यतेसाठी पाठविला होता.<br>**२)** शासनाचे दि.०९/०५/२००६ चे पत्रान्वये प्रस्ताव पुनविचारार्थ पाठविणेत आला होता.<br>**३)** सदरचा प्रस्ताव दि.२८/०६/२००९ चे छाननी समितीचे सभेपूढे ठेवला होता.<br>**४)** सदर प्रस्ताव वैयक्तीक असल्याने छाननी समितीचे अखत्यारीत नसल्याने इकडील दि.१८/०७/२००९ चे पत्रान्वये शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यात आला.<br>**इकडील दि.१८/०७/२००९ चे पत्रास अनुसरुन शासनाचे निर्देश येणे आहेत.** | **उपरोक्त दोन्ही प्रस्ताव हा वैयक्तीक स्वरुपाचे असल्याने व ते छाननी समितीच्या अखत्यारित येत नसल्याने मान्यता दिलेली नाही, असे बैठकीत संस्थानतर्फे सांगण्यात आले.**<br>**यावर यापूढे अशा प्रकारचे प्रस्ताव असतील तर त्यास अगोदर शासनाची मान्यता घ्यावी व नंतर प्रस्ताव सादर करावा असे मा.मंत्री विधी व न्याय यांनी सांगून सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता दिली.** |
| २७ | कोपरगांव तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा योजनेसाठी लोक वगर्णीची रक्कम मिळणेबाबत | **१)** इकडील दि. २२/०८/२००९ चे पत्रान्वये प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविला आहे.<br>**इकडील दि.२२/०८/२००९ चे पत्रास अनुसरुन शासनाचे निर्देश येणे आहेत.** | **याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आल्याचे बैठकीत सांगण्यात आले.** |
| | | **वशी- ०५ (उत्सव)** | |
| २८ | शिधा स्वरुपात देण्यात येणा-या मदती संबंधातील तयार करण्यात आलेल्या नियमावलीस मान्यता मिळणेबाबत. | **०१)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ ९७/०६, दि.२४/०१/२००६ त्यावर क्र. सासंवि- २००६/९९/(४९) दि.४/९/०६ अन्वये नियमावलीत सुधारणा करण्याबाबतच्या सुचनांचे पालन करुन फेर सादर करणेस सांगितले. त्यानुसार नियमावलीत दुरुस्ती करुन पुन्हा<br>**०२)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ ५३८६/ ०७, दि.०३/०४/२००७, **०३)** जा.नं. एसएसएस/वशी-०५/ ११२३५/ ०९, दि.०४/०९/२००९ अन्वये पत्र शासनास पाठविले आहे.<br>**अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही.** | **सदर प्रस्ताव बंद करण्यात यावा असे बैठकीत ठरले.** |
| २९ | दि.१७/२/०७ ते दि.१९/२/०७ अखेर झालेल्या राष्ट्रीय पेरुसंवाद व कृषी प्रदर्शनासाठी मंडप व इतर खर्चासाठी रु. १०,००,०००/- चे मंजूरीबाबत. | **०१)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ १२४४६/ ०७,दि. १०/०८/०७<br>**०२)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ १११४२/ ०९, दि.०४/०९/२००९<br>**अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही.** | **राष्ट्रीय पेरु संवाद मा.केंद्रीय कृषीमंत्री यांनी आयोजित केला होता. असे मा.मंत्री विधी व न्याय यांनी सांगितले.**<br>**शासनाची मान्यता नसतांना ऑडीटरने प्रस्तावावर सही कशी काय केली, तसेच नियमाला सोडून हा व्यय झालेला आहे हे बरोबर नाही, असे समितीचे उपाध्यक्ष श्री कोल्हे यांनी विचारणा केली.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **यावर यापूढे अशा प्रकारचे प्रस्ताव असतील तर त्यास अगोदर शासनाची मान्यता घ्यावी व नंतरच प्रस्ताव सादर करावे असे मा.मंत्री विधी व न्याय यांनी सांगून सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्याचे ठरले.** |
| ३० | संजीवनी प्रि कॅडेट ट्रेनिंग सेंटर, सहजानंदनगर, यांचे सन २००७-२००८ साठी तीन महिन्याच्या एकूण ४ बॅचेससाठी शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत. | **०१)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ १७७००/ ०७, दि. ३०/१०/०७<br>**०२)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ १११४२/ ०९, दि.०४/०९/२००९<br>**अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही.** | **सन २००७-०८ या वर्षात जो खर्च झालेला आहे त्यास मान्यता देण्यात आली. मात्र पूढील नवीन प्रकरणी काळजी घ्यावी असा निर्णय घेण्यात आला.** |
| ३१ | अध्यक्ष, राहाता तालुका बार असो.राहाता, यांचे राहाता कोर्टचे उद्घाटन प्रसंगी घातलेल्या मंडपाचे बील रु.१७,०००/- मात्रचे खर्चाबाबत. | **१)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ २८५५/ ०८, दि. २३/०२/२००८<br>**२)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ ७४३४/ ०८, दि. २१/०५/२००८<br>**३)** जा.नं.एसएसएस/वशी-०५/ १११४२/ ०९,दि.०४/०९/२००९<br>**अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नाही.** | **प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** |
| | | **बांधकाम विभाग** | |
| ३२ | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास शिर्डी येथे जमीन उपलब्ध करुन देणेबाबत. | मा.विधी व न्याय विभागाने त्यांचेकडील दिनांक ०४ नोव्हेंबर, २००८ रोजीचे पत्रान्वये एमटीडीसीला देऊ करण्यात आलेल्या जमिनीबाबत माहिती व जमिनीची किंमत आदि बाबत माहिती मागितलेली होती.<br>**मा. विधी व न्याय विभागाने मागितलेली माहिती इकडील पत्र क्र. १७६११ / दिनांक २८ नोव्हेंबर, २००८ अन्वये सहपत्रांसह कळविणेत आलेली आहे.**<br>**शासनस्तरावर प्रलंबित.** | **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** |
| ३३ | संस्थान निधीतून शिर्डी-पुणतांबा रस्ता विकसित करणे / पुणतांबा येथे भक्तनिवास बांधणे. | मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक २८ मार्च, २००८ रोजीचे पत्रान्वये सदरहू प्रस्ताव मा. छाननी समितीचे अभिप्रायार्थ सादर करावा, असे कळविण्यांत आलेले आहे.<br>**मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कळविल्याप्रमाणे सदरहू प्रस्ताव मा. छाननी समितीचे येत्या सभेपुढे अभिप्रायार्थ सादर करणेत येत आहे.** | **प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. छाननी समितीची मान्यता प्राप्त झालेनंतर आदेश काढण्याबाबत पूढील कार्यवाही करण्यात येईल.** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | मौजे पोहेगांव सोनेवाडी ते सावळीविहीर या रस्त्याचे मजबुती-करणासह डांबरीकरण करणेसाठी संस्थान मार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत. | विषयांकित रस्त्याचे विकासासाठी रक्कम रुपये ३१३.६८ लक्ष मात्र इतका निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव.<br>**मा. विधी व न्याय विभाग यांनी दिनांक १६ डिसेंबर, २००९ रोजीचे पत्रान्वये सदर प्रस्तावास छाननी समितीची मान्यता घेऊन व प्रस्तावाची विधीग्राहयता तपासून सादर करणेबाबत कळविले आहे.** | **प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. छाननी समितीची मान्यता प्राप्त झालेनंतर आदेश काढण्याबाबत पूढील कार्यवाही करण्यात येईल.** |
| ३५ | तिरुमलाई तिरुपती देवस्थान (आंध्रप्रदेश) येथे अतिथीगृह अथवा भक्तनिवास बांधण्यासाठी जागा मिळविणेबाबत. | विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २२ जानेवारी, २००९ रोजीचे पत्रानुसार, तिरुपती येथील जागा मिळाल्यास संस्थान तेथे विश्रांतीगृह बांधण्याचा खर्च सोसणार आहे कां, असल्यास त्या बदल्यात शासनाकडून काय मागणी आहे तसेच शिर्डी येथे उपलब्ध करुन द्यावयाची जागा संस्थान कशा प्रकारे जागा उपलब्ध करुन देणार आहे व त्याबाबत शासनाकडे कोणत्या बाबीची मागणी करणार आहे या दोन बाबींबाबत अभिप्राय मागितला आहे.<br>**चित्तूर जिल्हयातील, तिरुपती महसूल अंतर्गत दामिनाडू गांवातील ०१ एकर जागेची पहाणी करणेत आलेली असून, सदरहू जागा शासकीय नियमानुसार व निर्धारित किंमतीस खरेदी करणेबाबत कार्यवाही सुरु आहे. सदरहू प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. मा. जिल्हाधिकारी, चित्तूर यांचेशी पत्रव्यवहार करणेत आलेला आहे. तथापि अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही.** | **याबाबत साई संस्थान यांच्या स्तरावर तिरुमलाई तिरुपती देवस्थानाशी चर्चा करुन निर्णय घेणार आहेत .** |
| ३६ | कर्नाटक राज्यातील भक्तांसाठी एक एकर जमीन उपलब्ध करुन देणेबाबत. | मा.व्यवस्थापन समितीने याकामी योग्य ती जागा निवडणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेऊन सदरहू प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.<br>**क क्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग यांनी कर्नाटक शासनाचे मा. सचिव यांना दिनांक २१ जानेवारी, २००९ रोजी पत्र लिहून याबाबतचा वृत्तांत पाठविणेस सांगितले आहे.** | **सदर प्रस्ताव रद्द करण्यात आलेला आहे.** |
| ३७ | मौजे येसगांव येथे पदयात्री साईभक्तांसाठी संस्थान मार्फत निवासस्थळ उभारणेबाबत | विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून दिनांक १२ जून, २००८ रोजीचे पत्रान्वये असे निदेश दिले आहेत कि मोजे येसगाव येथील ग्रामपंचायतीच्या मालकीची १० - आर जमिन प्रथम श्री साईबाबा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या नांवे हस्तांतरीत करुन घेण्यात यावी व त्यानंतरच त्या जमिनीवर विश्रांतीस्थळ बांधण्याचा प्रस्ताव शासनास | **सदर प्रस्ताव बंद करण्याची निर्णय घेण्यात आला.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पाठवावा, असे कळविण्यांत आलेले आहे.<br><br>**सदरहू जागा संस्थानकडे हस्तांतरीत होणेबाबत व जागेस नांव लावणेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे. सदरहू जमिनीस प्रथम सरकारचे नांव लावणेबाबतची कार्यवाही सुरु आहे, तद्नंतर संस्थानकडे हस्तांतरीत करणेत येत आहे, असे दूरध्वनीवरील चर्चेत सांगणेत आले आहे.** | |
| ३८ | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर यांना विश्वस्तनिधीतून साधनसामुग्री पुरविणेबाबत. | **०१.** मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्रमांक २८४ (४५), दिनांक ०२ ऑगष्ट, २००७ रोजी रक्कम रुपये ४९,४२,८००/- मात्र निधी उपलब्ध करुन देणेबाबत मान्यता दिली आहे. सदरचा खर्च सन २००७-०८ च्या विश्वस्त निधीतून खर्च करणेत यावा असे नमूद केलेले होते.<br>**०२.** सदरचा खर्च सन २००९-१० मध्ये करणेत आल्याने त्यास मान्यता मिळणेसाठी सुधारीत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.<br>**मंजूर निधी सन २००९-१० मध्ये खर्च करणेस मान्यता मिळणेसाठीचा सुधारीत प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित.** | **सदर खर्च हा सन २००८-०९ मध्ये करणे अपेक्षित होते. परंतू तसा तो झालेला नसल्यामूळे तो सन २००९-१० या वर्षात करण्यात येईल असे संस्थानचे अध्यक्ष श्री ससाणे यांनी बैठकीत सांगितले.**<br>**त्यावर चर्चा करुन, योग्य कार्यपध्दती अवलंबून माहे फैब्रुवारी -२०१० मध्ये याबाबत ॲन्यूअल प्लॅन तयार करुन माहे मार्च -२०१० पूर्वी त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी असे निर्देश मा.मंत्री महोदयांनी दिले.** |
| ३९ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील लक्ष्मीनगर येथील रहिवाशी वसाहत स्थलांतर करणेबाबत. | आरक्षण क्रमांक २३ बाबत विकसन संस्था म्हणून संस्थान असा बदल करणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून कार्यवाही झालेनंतर पुर्नप्रस्तावित करावे, असे मा. विधी व न्याय विभाग यांनी दि. ०३.०१.२००७ रोजी कळविलेले आहे.<br>**आरक्षण क्रमांक २३ बाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डीने सुचविलेला लक्ष्मीनगर पुर्नवसन ऐवजी संपुर्ण शिर्डीतील बेघरांसाठी घरे हा फेरबदल स्वीकारणेत आलेला असून, सदरहू आरक्षणाची विकसन संस्था म्हणून संस्थान ची नेमणूक करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे सभेतील निर्णय मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना कळविणेत आलेला आहे.**<br>**शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून याबाबत कार्यवाही पूर्ण झालेनंतर शासनाकडे अहवाल पाठवून याबाबत योग्य तो** | **लक्ष्मीनगर वसाहत असेली जागा ही संस्थानची ५० वर्षापासूनची जागा आहे. तसेच सदर जागा ही कंम्पाऊंडला लागून आहे. संस्थानला त्यांची इतर प्रकल्प राबवितांना त्यांची सध्याची जागा कमी पडते. यास्तव लक्ष्मीनगर वसाहतीचे इतरत्र स्थलांतर करावे असे उपाध्यक्ष श्री कोल्हे यांनी सांगितले.**<br>**यावर मा.मंत्री महोदयांनी सदर लोकांची स्थलांतर करतांना रहिवाशांचा विचार करुन निर्णय घेण्यात यावा. तसेच सध्या जरी जागांचे भाव वाढले असले तरी त्यांना चांगल्या प्रतीची जागा देण्यात यावी, रहिवाशांची समजूत काढून त्यांना इतरत्र हलवावे लागेल. त्यांच्या याबाबतच्या मागण्या पूर्ण करुनच निर्णय घेण्यात यावा. तसेच या ठिकाणी पून्हा अतिक्रमण टाळण्यासाठी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची मदत घेण्यात यावी.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुर्न:प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेत येईल.<br>शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्र. नपं/बांध/कावि-५/ १४३३/२००९, दि.०७ जानेवारी, ०९ अन्वये फेरबदल प्रस्ताव सादर केलेला आहे. | |
| ४० | **विषयसूचीवरील उपरोक्त चर्चेव्यतिरीक्त सदर बैठकीमध्ये मा.मंत्री (विधी व न्याय ) यांनी वेळोळी पूढील सूचना दिल्या.** | | **०१. यापूढे सस्थानने कोणत्याही योजना राबविण्यापूर्वी आवश्यकतेनुसार शासनाची पूर्व मान्यता घ्यावी. शासन स्तरावरुन कार्योत्तर मंजूरी दिली जाणार नाही त्यानुषंगाने ज्या योजनांसाठी शासनाची पूर्वमान्यता आवश्यक आहे अशा योजना / खर्च शासनाकडून अगोदरच मंजूर करुन घेण्यात यावे.**<br>**०२. संस्थानने वार्षिक आराखडा तयार करुन त्यास शासनाची मान्यता घ्यावी जेण् करुन प्रत्येक योजनेसाठी वेगवेगळी मान्यता घेण्याची आवश्यकता रहाणार नाही. सन २०१०-११ साठीचा वार्षीक आराखडा तयार करुन त्यास मार्च २०१० पूर्वी शासनाची मान्यता घेण्यात यावी. त्यासाठी संस्थानने संबधित अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष येऊन चर्चेन्वये प्रकरण मार्गी लावावे. तसेच मंजूर केलेल्या योजनांचा मासिक प्रगती अहवाल संस्थानने शासनास सादर करावा.**<br>**०३. विधी व न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिन्यातून एकदा शिर्डी येथे भेट देऊन, तेथील कामांची पहाणी करावी व तेथील समस्या समजून घ्याव्यात.**<br>**०४. संस्थानमार्फत मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत बांधकामे -पार्किंग, अतिक्रमणे दूर करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी जी साधनसामुग्री आवश्यक असेल ती संस्थानने पूरवावी** |